# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ५/०३/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५७९** **विषय क्रमांक- ५७९**
**दिनांक – ०५/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५७९ दिनांक - ०५/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.सविवि/०४/कावि/४१/२०२४ दि.२३/०२/२०२४ आणि मा..स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३२०१ दि. १/३/२०२४ अन्वये, "दिव्यांगाच्या सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करणा-या संस्थेस अर्थसहाय्य देणे" अशी नवीन योजना कार्यान्वित करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५७९ दिनांक - ०५/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.सविवि/०४/कावि/४१/२०२४ दि.२३/०२/२०२४ आणि मा..स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३२०१ दि. १/३/२०२४ अन्वये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत दिव्यांग कल्याणकारी योजने अंतर्गत मा.महापालिका सभा ठराव क्र.४९, दिनांक १०/०५/२०२२ व मा.आयुक्त सो., यांचेकडील आदेश क्र.सविवि/०२/कावि/८७/२०२२, दि.३०/०५/२०२२ अन्वये, विविध दिव्यांग कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. झुंज दिव्यांग संस्थेने, दिव्यांगांच्या सामुदायिक विवाह सोहळयासाठी अर्थसहाय्य मिळणेकामी दिनांक:०७/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये समाज विकास विभागामध्ये विनंती केलेली आहे. सदर संस्थेमार्फत सात वर्षापासून एकूण ५२ विवाह सोहळे करण्यात आलेले आहेत. या विवाह सोहळयातून दिव्यांगांचा विवाह करणे, दांपत्यांना संसारोपयोगी साहित्य भेट देणे या सर्व बाबी देणगीदारांवर अवलंबून असतात. अलीकडच्या काळात देणगीदारांकडून आवश्यक असलेली देणगी प्राप्त होत नसल्याने भविष्यामध्ये दिव्यांगांचे विवाह सोहळे करणे शक्य होणार नाही. मनपाच्या दिव्यांग कल्याणकारी योजनेतून दिव्यांग विवाह सोहळयासाठी अर्थसहाय्य मिळावे. अशी विनंती केलेली आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये झुंज दिव्यांग संस्था ही एकमेव संस्था सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजन करते. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सदरचा उपक्रम हा एकमेव असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातील दिव्यांग कल्याणकारी योजनेमार्फत राबविणेत येणा-या, "मानव हिताच्या दृष्टिकोनातून काम करणा-या सार्वजनिक संस्था, सार्वजनिक ट्रस्ट यांना ऐच्छिक अनुदान देणे" या योजनेच्या धर्तीवर "दिव्यांगाच्या सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करणा-या संस्थेस अर्थसहाय्य देणे" |

| | |
|---|---|
| | अशी नवीन योजना कार्यान्वित करुन सदर योजनेस वार्षिक अर्थसहाय्य अदा करणेबाबत सहाय्यक आयुक्त (दिव्यांग कक्ष) समाज विकास विभाग यांनी दिनांक:२७/०९/२०२३ रोजी व उप आयुक्त, समाज विकास विभाग यांनी दिनांक:०४/१०/२०२३ यांनी अनुकुलता दर्शविलेली आहे. "दिव्यांगाच्या सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करणा-या संस्थेस अर्थसहाय्य देणे" अशी सोबतच्या प्रपत्रामध्ये सविस्तर नमूद केलेप्रमाणे नवीन योजना कार्यान्वित करणेकामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय: | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक- ५८०** **विषय क्रमांक- ५८०**

**दिनांक – ०५/०३/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ५८० दिनांक - ०५/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.लेखा/कावि/२८/पेन्शन/१६/२०२४ दि.२३/०२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३२४६ दि. १/३/२०२४ अन्वये, ८० वर्षे व त्यावरील पिंपरी चिंचवड मनपाचे निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनात दि.०१ जानेवारी २०२४ पासून वाढ करणेबाबत. |
| **ठराव क्र. ५८० दिनांक - ०५/०३/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.लेखा/कावि/२८/पेन्शन/१६/२०२४ दि.२३/०२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३२४६ दि. १/३/२०२४ अन्वये, शासन निर्णय क्र. सेनिवे-२०२१/प्र. क्र. ६४/सेवा-४ दि. १६ जानेवारी २०२४ नुसार निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार निश्चित झालेल्या मूळ निवृत्तीवेतन /कुटुंबनिवृत्तीवेतनात दि.०१/०१/२०२४ पासून पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत असून सदर लाभ केवळ दि.०१/०१/२०२४ पासून देय राहील. |

| | | |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ निवृत्तीवेतनात २० % वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ निवृत्तीवेतनात ३० % वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ निवृत्तीवेतनात ४० % वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ निवृत्तीवेतनात ५० % वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ निवृत्तीवेतनात १०० % वाढ |

तत्पुर्वी वयोमानानुसार वाढीव निवृत्तीवेतन घेत असलेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब

निवृत्तिवेतन धारकांना सुधारित दरानुसार फरकाची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही असे नमूद केलेले आहे. सदरचा शासन निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून सेवानिवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तिवेतन घेत असलेल्या सर्व सेवानिवृत्तीधारकांना लागू करावयाचा झाल्यास वय ८० वर्षे व त्यापुढील सेवानिवृत्त कर्मचारी संख्या व खर्च सतत वाढत जाणार आहे. जानेवारी २०२४ च्या पेन्शन बिलामध्ये ८० वर्षे व त्यावरील सेवानिवृत्त कर्मचारी संख्या व त्याकरीता अपेक्षीत असणारा पुढील एक वर्षाचा अंदाजे खर्च खालीलप्रमणे आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त कर्मचारी यांचे वय | संख्या | पेन्शन वाढीचा एक वर्षाचा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | ६९ | १८ लाख |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | १७ | ६ लाख |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | ८ | ३ लाख |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | ० | ० |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | ० | ० |
| एकूण : | | ९४ | २७ लाख |

सदरची बाब धोरणात्मक असून पुढील वाढत जाणा-या खर्चास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:** **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

सही-
(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

सही-
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका